**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## ग्राम उन्नत झाल्यास भारत उन्नत होईल - राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी
## विद्यापीठात उन्नत भारत अभियान विभागीय समन्वय संस्था - विदर्भचे लोकापर्ण

अमरावती -

ग्राम सुखी व समृद्ध झाले तर भारत देश उन्नत होईल. उन्नत भारत अभियानाच्या माध्यमातून ग्राम समृद्धीसाठी सर्व घटकांनी योगदान द्यावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांनी केले. विद्यापीठातील दीक्षांत सभामंडपामध्ये उन्नत भारत अभियानांतर्गत विभागीय समन्वय संस्था - विदर्भचे लोकार्पण राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी यांचे शुभहस्ते झाले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून संगणकतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, अमरावतीचे महापौर श्री चेतन गावंडे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरु डॉ. विलास भाले, पशु व मस्त्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु डॉ. आशिष पातुरकर, विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष श्री चैनसुख संचेती, उन्नत भारत अभियान विभागीय केंद्राच्या समन्वयक डॉ. अर्चना बारब्दे उपस्थित होते.

राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी म्हणाले, भारताला सोन्याची चिडीया म्हटल्या जायचे, ते दिवस आपल्याला आणायचे आहे, यासाठी ग्रामविकासावर प्रत्येकाने भर द्यायला हवा. आई जसे आपल्या पाल्यांना पालनपोषण करुन मोठे करते, तशाप्रकारे गावाचा विकास करण्याकरीता प्रत्येकाने पुढे येण्याची गरज आहे, हे आवाहन प्रत्येकाने स्वीकारले पाहिजे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी लोकांनी प्रचंड त्याग, संघर्ष केला, बलिदान दिले, आपल्याला फक्त घाम गाळून, श्रमदान करून गावाला उन्नत करायचे आहे.

उन्नत भारत अभियान खूप चांगली योजना आहे. एक मिशन म्हणून त्याकडे प्रत्येकाने पहावे. युवक व युवतींनी दृढ संकल्प करुन ग्रामीण भागातील अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न करावा व ती जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्यावी आणि केलेला संकल्प प्रत्यक्षात उतरावा व उन्नत भारत अभियान यशस्वी करावे, असेही ते म्हणाले.

प्रमुख अतिथी डॉ. विजय भटकर म्हणाले, आमच्या देशाला उन्नत करण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग महत्वाचा आहे. मानव संसाधन व विकास विभागाच्या प्रेरणेने व सहकार्याने उन्नत भारत अभियान उपक्रम सुरु झाला आहे. विदर्भ सर्वदृष्ट्या संपन्न मानल्या जायचा, त्या भागात आता शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहे, ही सर्वांसाठी खंत असून ग्रामीण भागाचा विकास झाल्यास देशाचा विकास होईल. सर्वांच्या प्रेरणेने हे काम व्हावे, त्याची सुरुवात विदर्भातून होत आहे. यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे, याचा सर्वांना आनंद आहे.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर प्रास्ताविक भाषण करतांना म्हणाले, डॉ. भटकर साहेबांनी उन्नत भारत अभियानाची वन कॉलेज टू वन व्हिलेज अशी कल्पना मांडली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला जोडण्याचे कार्य विद्यापीठ करित असून ५४० गाव दत्तक घेवून गावाचा विकास करण्याचा आमचा संकल्प आहे. ग्रामविकास व स्वयंरोजगारासाठी विद्यार्थी शक्तीचा फार मोठा हातभार लागणार असून भविष्यात या अभियानाच्या माध्यमातून ग्रामाचा विकास नक्की होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर व कुलगुरू डॉ. आशिष पातुरकर यांनी राज्यपाल श्री भगत सिंह कोश्यारी व पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचा सत्कार केला. उन्नत भारत अभियान विभागीय समन्वय संस्था विदर्भ केंद्राच्या लोकार्पण फलकाचे अनावरण तसेच माहिती पुस्तीकेचे विमोचन राज्यपालांचे हस्ते करण्यात आले. संचालन पीकेव्ही चे डॉ. किशोर बिडवाई यांनी, तर आभार डॉ. अर्चना बारब्दे यांनी मानले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, व्य.प. सदस्य, अधिष्ठाता, गणमान्य व्यक्ती, प्राधिकारिणी सदस्य, महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व रासेयोचे हजारो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २०/१२/२०१९.

दै............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:Users/PRO/Desktop/University News 2019 322